# जाहिरात

## शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

**(महाराष्ट्र शासन स्वामित्व कंपनी)**

**CIN No. : 70200MH1998SGC116664**

५ वा माळा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१

**दुरध्वनी क्र. २६५९०५८८/ २६५९१०८७/ २६५९१९८९ फॅक्स: २६५९०५८६**

**ई-मेल** :sppl_mumbai@rediffmail.com **वेबसाईट:**www.sppl.biz

क्रमांक:आस्था/नियुक्ती/प्र.क्र.८१/२०१८ दिनांक: ५ नोव्हेंबर, २०१९.

**शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या कार्यालयात (१) व्यवस्थापक (पणन) आणि (२) लेखाधिकारी या दोन पदांकरीता करार पध्दतीने एक वर्षाकरीता नियुक्ती करणेबाबत**

शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या कार्यालयात खालील अटींची पूर्तता करणाऱ्या (१) व्यवस्थापक (पणन)- १ पद, आणि (२) लेखाधिकारी- १ पद अशा एकूण २ पदांवर **एक वर्षासाठी करार पध्दतीने व एकत्रित परिश्रमिकावर** मुलाखतीने नियुक्ती करावयाची आहे. ही पदे तात्पुरत्या स्वरुपाची आहेत. सदर नेमणूका कायम अथवा दीर्घ स्वरुपाच्या नाहीत, त्यामुळे सेवा नियमित होणार नाहीत.

**कामाचे स्वरुप, अर्हता व अनुभव:**

**(१) व्यवस्थापक (पणन):** झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील पुनर्वसन घटक कालमर्यादेत पूर्ण होण्यासाठी आणि विक्री घटकात किमान ५० टक्के प्रमाणात परवडणारी घरे बांधण्यास विकासकांना प्रवृत्त करण्याच्या दृष्टीने विक्री घटकासाठी विविध वित्तीय संस्थांकडून बांधकाम कर्ज उपलब्ध होण्याची व्यवस्था करणे, विक्री घटकात बांधण्यात येणारी घरे विक्रीची सुयोग्य व्यवस्था करणे, तसेच पणन उपविभागातील इतर कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडणे.

सार्वजनिक उपक्रमातील/स्थावर मालमत्ता/गृहनिर्माण क्षेत्राशी संबंधित म्हाडा, सिडको, एमएमआरडीओ अथवा शासन सेवेत परवडणारी घरे प्रकरणे हाताळलेल्या किमान २ वर्षांचा अनुभव अथवा गृहनिर्माण क्षेत्रातील गेल्या ३ वर्षातील उलाढाल रु.५०० कोटीपेक्षा जास्त असलेल्या बँकिंग/ वित्तीय संस्थेतील राज्य/केंद्र शासनाच्या विविध सार्वजनिक उपक्रमात सहाव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी १५६००-३९१०० + ग्रेड पे ६६०० अथवा सातव्या वेतन आयोगाच्या S-२३: ६७७००-२०८७०० पे मॅट्रीक्स अथवा तत्सम पदावरील अशा स्वरुपाच्या पणन विषयक कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक.

**(२) लेखाधिकारी:** कंपनी अधिनियम, २०१३ आणि केंद्र शासनाच्या कंपनी व्यवहार मंत्रालयाने विहित केलेल्या 'अकाऊंटिंग स्टॅन्डर्ड' प्रमाणे कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडणे आणि वैधानिक लेखा परिक्षक/अंतर्गत लेखा परिक्षक आणि प्रधान महालेखाकार कार्यालयाने वेळोवेळी सुचविलेल्याप्रमाणे लेखे संबंधित आवश्यक व योग्य ती कार्यवाही करण्यासाठी चार्टर्ड अकाऊंटंटची (सनदी लेखापाल) आवश्यकता आहे. किमान ५० कोटी वार्षिक उलाढाल (turnover) असलेल्या राज्य

अथवा केंद्र शासनाच्या कंपनी अधिनियमान्वये गठीत झालेल्या कंपनीच्या लेख्यांचे प्रत्यक्ष काम केल्याचा किमान १ वर्षांचा अनुभव असणाऱ्यांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल. राज्य अथवा केंद्र शासनाच्या अखत्यारितील कंपनीच्या अशा कामाचा अनुभव असलेली चार्टर्ड अकाऊंटंट (सनदी लेखापाल) व्यक्ती उपलब्ध न झाल्यास खाजगी सेवेतील तत्सम किमान २ वर्षांचा अनुभव असलेल्या चार्टर्ड अकाऊंटंट व्यक्तींचा विचार करण्यात येईल.

**वयोमर्यादा: १) व्यवस्थापक (पणन) पदाकरीता** दि. १ नोव्हेंबर, २०१९ रोजी वय ६१ वर्षापेक्षा जास्त नसावे. तथापि सदरहू पदासाठी अनुभव विहित केलेल्या किमान अटीपेक्षा जास्त असल्यास वयोमर्यादा ३ वर्षेपर्यंत शिथिल करण्याचे अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक, शिपुप्रम यांना आहेत.

**२) लेखाधिकारी पदाकरीता** दि.१ नोव्हेंबर, २०१९ रोजी वय ३५ वर्षांपेक्षा जास्त नसावे. तथापि सदरहू पदासाठी विहित केलेल्या किमान १ वर्षांपेक्षा जास्त अनुभव असलेल्या चार्टर्ड अकाऊंटंट व्यक्तींसाठी वयोमर्यादा तितक्या वर्षांपर्यंत तथापि जास्तीत जास्त ६२ वर्षे पर्यंत शिथिल करण्याचे अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक, शिपुप्रम यांना आहेत.

**एकत्रित वेतनाबाबत:** (१) व्यवस्थापक (पणन), आणि (२) लेखाधिकारी (या दोन्ही पदाकरीता राज्य/केंद्र शासन सेवेतून निवृत्त झालेल्या व्यक्तीची निवड झाल्यास सेवानिवृत्तीच्या वेळचे मूळ वेतन + ग्रेड पे असल्यास + महागाई भत्ता+ घरभाडे भत्ता *वजा* निवृत्ती वेतन इतके एकत्रित वेतन देण्यात येईल. मंडळे/महामंडळे इत्यादि सार्वजनिक उपक्रमातून निवृत्त झालेल्या व्यक्तीची निवड झाल्यास त्यांना निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई भत्ता मिळत नसल्यामुळे सेवानिवृत्तीच्या वेळच्या वेतनातून केवळ संभाव्य निवृत्तीवेतन (महागाई भत्ता जमेस न धरता) वजा करुन एकत्रित वेतन ठरविण्यात येईल. *उपरोक्त अनुभव असलेल्या तथापि सध्या खाजगी सेवेत असलेल्या व्यक्तीची निवड लेखाधिकारी पदाकरीता झाल्यास सातवा वेतन आयोगाच्या पे मॅट्रीक्समधील रू. ४४९००/- हे मूळ वेतन + राज्य शासनाकडून वेळोवेळी सुधारीत दराने महागाई भत्ता + घरभाडे भत्ता जमेस धरून एकत्रित वेतन ठरविण्यात येईल. त्याखेरीज आवश्यकतेनुसार केवळ दूरध्वनी भत्ता देण्याचा विचार करण्यात येईल. इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.*

**अटी व शर्ती**

१. उपरोक्त नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपाची १ वर्षाच्या कालावधीसाठी राहिल. ती कायम अथवा दिर्घ स्वरुपाची नाही.
२. सदर पदांवर करार पध्दतीने नियुक्ती करण्यात येईल. उमेदवारास कोणत्याही प्रकारच्या स्थायी सेवेसाठी दावा करता येणार नाही, किंवा सेवेत नियमित करण्याचा कोणताही हक्क राहणार नाही.
३. उमेदवाराचे कामकाज कोणत्याही वेळी असमाधानकारक आढळल्यास मा. व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने एक महिन्याची पूर्व सूचना देऊन सेवा समाप्त करण्यात येईल.
४. सेवा सोडावयाची झाल्यास किमान एक महिन्याची पूर्वसूचना अथवा एक महिन्याचे मूळ वेतन देणे आवश्यक राहील.
५. सदर पदावर शासकीय सेवेतून/स्थानिक स्वराज्य संस्थेतून/सार्वजनिक उपक्रमातून निवृत्त झालेल्या व्यक्तीची निवड व नियुक्ती झाल्यास त्यांच्या नियुक्ती वेळच्या अंतीम वेतनातून

'निवृत्ती वेतन' अथवा 'संभाव्य निवृत्ती वेतन' *वजा* करुन तितके 'एकत्रित वेतन' म्हणून देण्यात येईल. तथापि इतर कोणतेही भत्ते देय व अनुज्ञेय राहणार नाहीत. इतर अटी व शर्ती नियुक्तीबाबतच्या करारान्वये निश्चित करण्यात येतील.

६. सदर कंत्राटी नेमणूक १ वर्षानंतर आपोआप संपुष्टात येईल. भविष्यातील परिस्थितीनुसार आवश्यकता भासल्यास पुन्हा फक्त एक वर्षाकरीता कंत्राटी नेमणूक करण्याचा विचार होऊ शकेल, तथापि सदर नियुक्ती कायम अथवा सेवा नियमित स्वरुपाची नाही, याची नोंद घेणे आवश्यक आहे.

७. कोणतेही कारण न देता अर्ज स्विकारणे अथवा नाकारणे हा अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक, शिपुप्रम यांचा राहील.

इच्छुक उमेदवारांनी स्वत:च्या संपूर्ण माहितीसह अर्ज व्यवस्थापक (प्रशासन), शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित (शिपुप्रम) गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे(पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांच्याकडे दिनांक २२ नोव्हेंबर, २०१९ किंवा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत पोहचतील, याची दक्षता घ्यावी.

**दिनांक: ५ नोव्हेंबर, २०१९**
**ठिकाण: मुंबई.**

**व्यवस्थापक (प्रशासन)**
**शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित**